अष्टयोगात शिवराय

प्रा. डॉ. सतीश कदम, अध्यक्ष, अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद 9422650044

आपला कुठला ना कुठलातरी लकी नंबर आहे. ही प्रत्येक माणसाची भावना कायम असते. हा प्रकार फक्त भारतातच आहे असे नाहीतर युरोपसारख्या पुढारलेल्या राष्ट्रातही हजारो वर्षापासून हा विषय वारंवार चर्चिला जातो. भारतात याला अंकशास्त्र तर इंग्रजीत Numerology म्हणतात. ग्रीसमधील पायथ्यागोरसला अंकशास्त्राचा जनक मानला जातो. त्यानुसार प्रत्येक व्यक्तीच्या विचारावर, जीवनशैलीवर या अंकाचा प्रभाव पडत असतो. हा अंदाज सर्वस्वी खरा असतोच असे नाही. अंकशास्त्रातील तीन ठोकताळयावरून माणसाच्या जीवनातील भविष्याचा अंदाज बांधता येतो.

1. जन्मांक – इंग्रजीत याला birth number म्हटले जाते. जन्मतारखेतील 1 ते 9 आकड्यांना जन्मांक म्हटले जाते. आणि जर 10 ते 31 तारीख असेलतर यातील तारखेची बेरीज केली जाते, उदा. 10 तारीख असेलतर त्याला 1+ 0 = 1 किंवा 31 असेलतर 3+ 1= 4 याप्रमाणे त्याचा जन्मांक काढला जातो.

2. भाग्यांक – इंग्रजीत याला Life Path Number म्हणतात. भाग्यांक काढण्यासाठी संपूर्ण जन्मतारखेची बेरीज केली जाते. उदा. 19 फेब्रुवारी 1630 याचा भाग्यांक काढण्यासाठी जन्मतारीख 19-2-1630 याप्रमाणे लिहून त्याची 1+9+2+1+6+3+0 = 22 = 2+2 = 4 याप्रमाणे बेरीज करून 4 हा भाग्यांक काढला जातो.

3. नामांक – नामांक म्हणजे Number आणि नामांक काढण्यासाठी व्यक्तीच्या स्पेलिंगच्या स्थानाचा विचार केला जातो. त्यानुसार A = 1, B= 2 याप्रमाणे पुढे Y = 25 = 2 + 5 = 7 असा क्रम लावून त्याचा भाग्यांक काढला जातो. उदा. Shivaji या नावाचा भाग्यांक काढायचा असेलतर **S** = 19=1+9= 10= 1+0= 1, **H**= 8, **I** = 9, **V** = 22= 2+2= 4, **A** = 1, **J** = 10= 1+ 0 =1, **I** = 9. याची एकत्रित बेरीज 1+8+9+4+1+1+9 = 33 = 3+3= 6 याप्रमाणे असेलतर त्याचा नामांक 6 येईल.

<u>अंकशास्त्र म्हणजे ज्योतिष नाही</u> तर तो एक ठोकताळा आहे. त्यात प्रत्येक अंकाचे गुणदोष सांगितले जातात. उदा. 8 भाग्यांकाचे व्यक्ति हे ध्येयनिष्ठ , कष्टाळू, ताकदवान आणि आक्रमक असतात. योगायोगाने छत्रपती शिवरायांच्या जीवनात 8 हा अंक अनेकवेळा आलेला आहे. याठिकाणी आपण त्याला केवळ योगायोग मानून शिवरायांच्या जीवनकार्याची वेगळया पैलूतून मांडणी केलेली आहे.

1. शिवरायांच्या इंग्रजीतील नामांकाची बेरीज येते 8 – Shivaji Shahaji Bhosale याचा नामांक **SHIVAJI- S** = 19=1+9= 10= 1+0= 1, **H**= 8, **I** = 9, **V** = 22= 2+2= 4, **A** = 1, **J** =

10= 1+ 0 =1 , **I** = 9. याची एकत्रित बेरीज 1+8+9+4+1+1+9 = 33 = 3+3= **<u>6</u>, SHAHAJI – S** = 19=1+9= 10= 1+0= 1 , H = 8 , A= 1, H= 8, A = 1, J = 10 = 1+0 = 1 , I = 9 याची बेरीज 1+8+1+8+1+1+9 = 29 = 11 **= <u>2,</u> Bhosale** – B = 2, H = 8, O =15= 1+ 5 = 6, S = 19 = 1+9 = 10 = 1+0 = 1 , A = 1, L = 12= 1+2 = 3 , E = 6 याची एकत्रित बेरीज 2+8+6+1+1+3+6 = 27= 2+7 = <u>9.</u> या तीन नावातील नामांकाची बेरीज – 6 + 2 + 9 = 17 =1+ 7**= <u>8</u>**

2. शिवरायांच्या जन्म आणि मृत्युच्या तारखेची बेरीज यते 8

जन्म 19 फेब्रुवारी 1630 =1+9+2+1+6+3+0=22=2+2=4,

मृत्यू – 3 एप्रिल 1680 = 3+4+1+6+8+0= 22= 2+2= 4.

जन्म आणि मृत्युच्या तारखेची एकत्रित बेरीज 4+4 = 8

3. शिवरायांच्या दोन राजधान्या - रायगड आणि राजगड यातील अक्षरे आहेत 4 + 4 = 8

4. शिवरायांचे विवाह झाले 8. सईबाई , सगुणाबाई, सोयराबाई, पुतळाबाई, लक्ष्मीबाई, सकवारबाई, काशीबाई व गुणवंताबाई

5. शिवरायांना मुले होती 8. त्यात 2 मुले छत्रपती संभाजी आणि राजाराम व 6 मुली सखूबाई, राणू, अंबिका, दीपाबाई, कमळजाबाई आणि राजकुंवर यांचा समावेश होतो.

6. शिवरायांची मुद्रा अष्टकोनीच आहे. ‘<u>प्रतिपच्चंद्रलेखेव</u> वर्धिष्णूविश्ववंदिता II शाहसूनो शिवस्यैषा मुद्राभद्रायराजते II’ याशिवाय या मुद्रेतील अक्षरे 32 असून प्रत्येक अक्षर हे 8 च्या पटीत आहे. प्रत्यक्षात ही मुद्रा शहाजीराजांनी दिलेली असून शिवरायांनी या मुद्रेचा वापर केल्याचा पहिला कागद 1646 सालचा आहे, याची बेरीज 1+6+4+6 = 17 म्हणजे यातही 1+7 = 8 येते.

7. शहाजीराजांची ‘बंदा शहाजी भोसला’ मुद्रा अष्टकोनीअसून त्यातील अक्षरे 8 च आहेत.

8. महाराणी येसुबाईंच्या ‘ श्री सखी राज्ञी जयते’ या मुद्रेतही 8 च अक्षरे आहेत.

9. शिवरायांनी 6 जून 1674 ला आपला राज्याभिषेक करून घेतला. त्यावेळी महाराजांचे वय होते 44 वर्षे. यातही 4+4 = 8 येते. तर राजपुत्र संभाजीराजेंचे वय होते 17 वर्षे म्हणजे 1+7 = 8. प्रत्यक्षात राज्याभिषेक 29 मे ते 6 जून असा 8 दिवस चालला.

10. महाराजांचे सिंहासन अष्टकोनी असून ते 8 च्या पटीत चौपट म्हणजे 32 मनाचे होते.

11. स्वराज्याच्या मंत्रिमंडळाची संख्याही 8 च होती. ज्याला अष्टप्रधानमंडळ म्हटले जाते.

12. रायगडावरील अनेक बांधकामात 8 आल्याचे दिसून येते. त्यानुसार वाडेश्वराच्या शिखराचे आतील बांधकाम अष्टकोनी आहे, गडावरील बाजारपेठांची संख्या 44 म्हणजे 4+4 = 8 येते , रायगडावरील तीन मनोर्यांपैकी राजवाड्यासमोरील मनोरा अष्टकोनीच आहे. गडावर राण्यासाठी जी शौचकुपे (संडास) बांधलेले आहेत , त्यांची संख्या 8 आहे. वास्तविक पाहता रायगड बांधण्यापूर्वीच सईबाईसाहेबांचे निधन झालेले होते.

13. रायगडासोबत पाचाडला जिजाऊसाठी जो वाडा बांधला त्या वाड्याला 17 बुरूज आहेत, त्याची बेरीज 1+7=8

14. शिवरायांचा पहिला विवाह इ.स. 1640 साली सईबाई यांच्याशी झाला   , त्यानंतर बरोबर 8 वर्षांनी 1648 ला राजांनी कोंढाणा किल्ला ताब्यात घेऊन आपल्या राजकीय हालचालीस खर्या अर्थाने सुरुवात केली.

15. सईबाईंचे निधन झाल्यानंतर त्यांचा पुत्र संभाजीराजांना स्वत:चे दूध पाजून मोठे करणार्या धाराईआवा गाडे यांना कापूरहोळ याठिकाणी वार्षिक 26 होनांची जहागिरी देण्यात आली. याची बेरीज येते 2+6 = 8 यते.

16.पुरंदराच्या वेढ्यात अतुलनीय पराक्रम करून मुररबाजी देशपांडे यांनी बलिदान दिले याची तारीख- 11 जून 1665, 1+1+6+1+ 6+6+5 = 26 = 2+6 = 8

17. शिवरायांची आग्राभेट आणि 8 हे समीकरण मोठे रोचक आहे. कारण शिवराय आग्र्यात पोहोचले तो दिवस होता , 11 मे 1666. याची बेरीच 1+1+5+1+6+6+6 = 26 = 2+6 = 8. विशेष म्हणजे महाराजांच्या या भेटीचे वर्णन करताना परकलदास म्हणतो की, यावेळी शिवाजीच्या ताफ्यात 8 हत्ती होते.

18. औरंगजेबाच्या वाढदिवसानिमित्ताने दरबारात गेलेल्या शिवाजीराजांनी जो नजराना दिला तो असा होता , 1000 मोहोरा व 2000 रुपये नजर आणि 5000 निसार केले. याची बेरीज- 1 +0+0+0+2+0+0+0+5+0+0+0 = 8000 = 8+0+0+0 = 8. विशेष म्हणजे यावेळी औरंगजेबाचे वय होते 50 वर्ष तर शिवरायांचे वय 36 वर्ष होते. दोघांच्या वयातील फरक होता 26 वर्षाचा, 2+6 = 8.

19. शिवाजी महाराज आग्र्यातून निसटले ती तारीख होती 17 ऑगस्ट 1666. याची बेरीज याप्रमाणे- 1+7+8+1+6+6+6 = 35 = 3 +5 = 8

20. सरनोबत नेताजी पालकरांना मोगल सैन्याने धारूर याठिकाणी अटक केली त्याची तारीख होती 24 आक्टोबर 1666. म्हणजेच 2+4+1+0+1+6+6+6=26=2+6=8. त्यानंतर औरंगजेबाने नेताजीला मुस्लिम बनविलेले होते. त्या नेताजीला महाराजांनी परत आपल्या धर्मात घेतले त्याची तारीख होती 9 जून 1676. म्हणजेच 9+6+1+6+7+6 = 35 = 3+5 = 8

21. स्वराज्याचे दुसरे सेनापती प्रतापराव गुजर यांची कारकीर्द 1666 ते 1674 अशी 8 वर्षाची असून प्रतापरावांना नेसरी याठिकाणी वीरमरण आले ती तारीख होती- 24 फेब्रुवारी 1674. याची बेरीज – 2+4+2+1+6+7+4 = 26 = 2+6 =8

22. शिवरायांच्या कर्नाटक मोहिमेतही बर्या चदा 8 आल्याचे दिसून येते. त्यानुसार भागानगरला कुतुबशाहाची भेट घेतल्यानंतर 1 एप्रिल 1677 ते 3 एप्रिल 1678 याप्रमाणे ही मोहिम 368 दिवस चालली, ज्याची बेरीज 3+6+8 = 17= 1+7 = 8 येते. छत्रपती शिवाजी महाराज आणि व्यंकोजीराजे यांच्या भेटीची तारीख 16 जुलै 1677 , म्हणजेच 1+6+7+1+6+7+7 = 35 = 3+5 = 8. याशिवाय व्यंकोजीराजेंकडे त्यांचा मुक्काम 8 च दिवस होता.

23. तारखेशिवाय शिवरायांच्या कारकिर्दीत मराठी महिन्यातील अष्टमीला काही घटना घडल्या, a. शके 1582 शार्वरी नाम संवस्तरे , ज्येष्ठ शुद्ध अष्टमीला वासोटा जिंकला. b. शाहीस्तेखानावर आक्रमण केले तेव्हा चैत्र शुद्ध अष्टमी होती. c. महाराजांच्या कर्नाटक स्वारीची सांगता झाली त्यादिवशी श्रावण शुद्ध अष्टमी होती. d. संभाजीराजेंच्या हत्येनंतर 19 ऑक्टोबर 1689 ला झुल्फिकारखानाने रायगड जिंकून घेतला याची बेरीज 8 येते , मोगलांच्या ताब्यात गेलेला हा रायगड तब्बल 44 (4+4= 8) वर्षांनी 1733 ला परत स्वराज्यात आला. त्यादिवशी आषाढ शुद्ध अष्टमी होती. e. संभाजीराजांच्या मृत्यूनंतर राजाराममहाराजांनी जिंजीला राजधानी हलविली , तिकडे जाण्यासाठी ते आश्विन शुद्ध अष्टमीला पन्हाळयावरून बाहेर पडले.

24. शिवाजी राजांनी वयाच्या 15 व्या वर्षी आपल्या राजकीय कारकिर्दीस सुरुवात केली , ती थेट वयाच्या 50 वर्षापर्यंत चालू होती , म्हणजे राजांची राजकीय कारकीर्द ही 35 वर्षाची होती , याची बेरीज येते 8. एवढेच कायतर संभाजीराजांची कारकीर्द ही 8 वर्षे 8 महिन्यांची आहे. एवढेच कायतर संभाजी राजेंचे आयुष्य 32 तर राजाराम महाराजांचे आयुष्य हे फक्त 30 वर्षाचे राहिले , दुर्दैव्याने याची बेरीजही 8 येते.

25. छत्रपती शिवाजी महाराज आणि औरंगजेब हे एकमेकांचे राजकीय शत्रू. दोघांच्या मृत्यूच्या तारखेतील (3 एप्रिल 1680 आणि 20 फेब्रुवारी 1707) फरक हा 26 वर्ष (2+6 =8) 8

महीने आणि 17 दिवस (1+7 =8) दिवसांचा आहे. यात वर्ष , महिना आणि दिवस या तिन्हीमध्ये 8 येते.

26. एवढेच कायतर छत्रपती शिवरायांची समाधीही अष्टकोनीच बांधलेली आहे.

अशारितीने याठिकाणी आपण केवळ 26 म्हणजे 2+6 = 8 च घटनांचा आढावा घेतलेला आहे. ‘अष्टयुगात शिवराय ’ नावाच्या माझ्या पुस्तकातील हा काही अंश याठिकाणी दिलेला आहे. आपणही वाचन करताना किंवा गडकोट किल्ले फिरत असताना याप्रमाणे 8 चा काही मेळ बसतो का हे पहावे. खरंतर 8 अंकामुळे शिवरायांच्या पराक्रमात कुठला फरक पडला किंवा नाही हे याठिकाणी अजिबात ग्राह्य धरलेले नाही. मात्र तरीही एक प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे महाराजांनी काही बाबतीत 8 या अंकाचा कुठेतरी मेळ घातलेला आहे. त्यांची समाधी अष्टकोनी असावी हा काही निव्वळ योगायोग मानता येणार नाही. आपण बस एवढेच म्हणू शकतो की , शिवरायांचे 8 वावे रूप , शिवरायांचा 8 वावा प्रताप , शिवरायांचा 8 वावा साक्षेप भूमंडळी , म्हणून आपणही 8 वावे , अष्टौप्रहार शिवराय !

XXX